**CNR No. MHWR030058302022**
**नि.फौ.ख.क्र. ८१०/२०२२**
**शासन / दिनेश व इतर ४**
**निशाणी क्रमांक ४२**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा यांचे न्यायालयात**
पिठासिन अधिकारी : वि. प्र. खंदारे

**दोषारोप**

मी, वि. प्र. खंदारे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा, याद्वारे आपणावर दोषारोप ठेवत आहे की,

तुम्ही :
१. दिनेश जगदीश कैथवास,
वय : २८ वर्षे, व्यवसाय : खाजगी नोकरी,

२. जगदीश सुजपाल कैथवास,
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : टेलरिंग काम,

३. सुनिता जगदीश कैथवास,
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : घरकाम,

४. गणेश जगदीश कैथवास,
वय : ३० वर्षे, व्यवसाय : व्यापार,

सर्व रा. प्लॉट नं. ६५, ८५, प्लॉट एरिया,
रमा नगर, नागपुर, ता. जि. नागपुर.

दि. १८/०२/२०२२ ते दि. ०९/०५/२०२२ या कालावधी दरम्यान प्लॉट नं. ६५, पंच्याशी प्लांट एरिया, रमा नगर, नागपुर, ता. जि. नागपुर येथे तुम्ही आरोपींनी आपसांत संगनमत करुन फिर्यादी नितु यांना *'तुझया माहेरकडील लोकांनी आमचा मानपान केला नाही, गाडी घेण्यास कमी पैसे दिले, मोठमोठया वस्तु भेट दिल्या नाही'* असे म्हणून तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला. तसेच तुम्ही आरोपी क्र. १ ने तिला *'तु मला पसंत नाही, तुझया पेक्षा सुंदर पोरी माझे मागे फिरते, मी तुझयासोबत संसार करू शकत नाही, तु माहेरी निघून जा'* असे म्हणून तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. अशा प्रकारे तुम्ही आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला. त्यामुळे तुम्ही माझ्या अखत्यारीत भारतीय दंड विधान कलम ४९८—अ सहवाचित कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

द्वितीयत:

वर नमूद वेळी, स्थळी व कालावधी दरम्यान तुम्ही आरोपींनी आपसात संगणमत करुन फिर्यादीला हुंडयाची मागणी करून व त्याकरीता तुम्ही फिर्यादीचा छळ करून तिचेकडून बॅकेमार्फत तुमचे खात्यात पैसे ट्रान्सफर करून घेतले. त्यामुळे तुम्ही माझ्या अखत्यारीत हुंडा प्रतिबंधक कायदयाचे कलम ३ चा भंग करुन कलम ४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला आहे.

वरील दोषारोपाकरिता तुमचे विरूध्द या न्यायालयात खटला चालविण्यात येतो.

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.01.03 17:19:39 +0530

( वि. प्र. खंदारे )

दिनांक : ०३/०१/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**<u>प्र मा ण प त्र</u>**

वरील दोषारोपातील मजकूर आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. तो त्यांना समजला. त्यांचे प्रतिवेदन स्वतंत्र नोंदविण्यात आले.

माझे समक्ष

( वि. प्र. खंदारे )

दिनांक : ०३/०१/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.
(फौजदारी न्यायालय क्र. १)